मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष-फाल्गुन १९३७
जानेवारी-मार्च २०१६ / खंड ३९ अंक ४



## शेती आधारित उद्योग विशेषांक

# अर्थसंवाद

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचा आधारस्तंभ ढासळला

**चारुदत्त गोखले, जळगाव,**
कार्याध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सदस्य आणि आधारस्तंभ असलेले आदरणीय पद्मश्री डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांचे दि.२५ फेब्रुवारी २०१६ रोजी मुंबईत जसलोक रुग्णालयात्त निधन झालं. त्यांच्या निधनानं शेतकऱ्यांचा खरा कैवारी गेला. एक महान उद्योगपती, विचारवंत, समाजसुधारक आणि गांधीवादी गेला. त्यांच्या निधनाचे वृत्त सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचले. अत्यंत आपुलकीनं कायम पडद्यामागं राहून मराठी अर्थशास्त्र परिषदेला त्यांनी कायमच भक्कम आधार दिला होता हे किती जणांना माहीत आहे? अर्थशास्त्रासारख्या रूक्ष परंतु महत्त्वाच्या विषयाचं अनन्यसाधारण मोल जाणून ते आपली संपूर्ण ताकद तिच्यामागे उभी करत. परिषदेसाठी काम करणाऱ्या माणसांना, कार्यकर्त्यांना त्यांनी नेहमीच सर्व प्रकारचे बळ दिले.

परिषदेचे मुखपत्र म्हणजे 'अर्थसंवाद' हे त्रैमासिक आहे. त्याचा एक विशेषांक 'शेती विशेषांक' म्हणून प्रसिद्ध केला होता. त्या अंकासाठी लेख, मजकूर व अन्य मार्गांनी त्यांनी भरपूर मदत तर केलीच शिवाय रु.७१०००/- एवढी आर्थिक मदतही दिली. हे सगळे अर्थातच त्यांनी परिषदेवरील प्रेमापोटी, परिषदेच्या कार्यासाठी, परिषदेवरील लोभासाठी केले. 'अर्थसंवादला' त्यांनी आतापर्यंत रु.१ लाखावर किंमतीच्या जाहिराती दिल्या आहेत.

२००४ साली मराठी अर्थशास्त्र परिषदेचं वार्षिक अधिवेशन जळगावमध्ये भरलं होतं. त्या निमित्त महाराष्ट्रातील विविध भागातून अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत आणि अर्थशास्त्राचे प्राध्यापक, शिक्षक इथे आले होते. ही सुवर्णसंधी मानून त्यांनी या सर्वांना एक पूर्ण दिवस जैन हिल्सवर पाहुणचार घेण्यासाठी निमंत्रित केलं. त्यांचे प्रेमाने आतिथ्य तर केलेच पण त्यांच्याशी चर्चा केली, गप्पाही मारल्या. या मनमोकळ्या वागण्यानं सर्व मंडळी जाम खूष झाली होती.

''एखादे वर्षी जर परिषदेला महाराष्ट्रातून कोठूनच निमंत्रण आलं नाही

आणि त्यामुळं वार्षिक अधिवेशन रखडलं तर माझे हेच आमंत्रण समजून तुम्ही हक्कानं, आनंदानं थेट जळगावला जैन हिल्सवर या'' या शब्दात त्यांनी परिषदेला निर्धास्त केलं होतं. एवढी प्रचंड आस्था त्यांना परिषदेबद्दल होती.

जैन उद्योगात जळगावमध्ये आज १०,००० पेक्षा जास्त लोकांना थेट रोजगार आहे. त्यापेक्षाही जास्त लोकांना अनुषांगिक, अवलंबित कामांमुळे आर्थिक लाभ होत असतो. जैन उद्योगाच्या विस्तारामुळे जळगाव शहर, जिल्हा आणि खान्देश यांच्या आर्थिक उलाढालीत घसघशीत वाढ झालीय. होते आहे, इतरही मोठे मोठे उद्योग आकर्षित झालेत. हाच खरा उद्याच्या उद्योग विकासाचा पाया आहे.

जळगावचे नावं जैन उद्योगाने जगभर नेलेय. जगभरात आज ३० कारखाने १४६ कार्यालये व डेपो, व सुमारे ७००० वितरक कार्यरत आहेत. उत्पादनांमध्ये कृषी पाईप्स व ठिबक सिंचनात जगात प्रथम क्रमांक, केळी व डाळिंबांच्या टिश्यूकल्चर मध्ये जगात प्रथम, आंबा फळप्रक्रियेतही जगात प्रथम, कांदा व भाजीपाला प्रक्रियेत जगात दुसऱ्या स्थानी असे विक्रम स्थापित केले आहेत. त्यासाठी त्यांचेवर देशभरातून, जगभरातून पुरस्कार, सन्मानांचा तर पाऊसच पडलाय. आंतरराष्ट्रीय १२, राष्ट्रीय १३५, राज्यस्तरीय ४१, संस्था गौरव ७१, मानांकने १६, व्यक्तींद्वारे गौरव २ असे एकूण २७७ पुरस्कार मिळालेत.

जगभरात, उद्योग विश्वात मानाचं विश्वासपात्र स्थान लाभलेल्या एकमेव 'फॉर्च्युन' नियतकालिकानं 'चेंज-द-वर्ल्ड २०१५'म्हणून अत्यंत चुरशीनं निवडलेल्या जगभरातील पहिल्या ५१ कंपन्यांमध्ये जैन इरिगेशनला ७ वे मानाचे स्थान दिलेय. या यादीत भारतातील ही एकमेव कंपनी आहे. ह्या निमित्ताने जैन उद्योग समूहाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला.

आपल्या अथक प्रयत्नाने, कर्तृत्वाने, परिश्रमाने 'जैन उद्योग समूह' आणि जळगाव शहराला जगाच्या नकाशावर स्थान प्राप्त करुन देणाऱ्या सुपुत्राला आपण कायमचे मुकलो आहोत. या भूमिपुत्राला, थोर उद्योग महर्षींना, ज्येष्ठ विचारवंताला, पद्मश्री स्वर्गीय डॉ.भवरलाल हिरालाल जैन ह्यांच्या पवित्र स्मृतीला मराठी अर्थशास्त्र परिषद व परिवाराची ही वंदनीय, भावपूर्ण श्रद्धांजली।

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे

भावपूर्ण श्रध्दांजली



# पद्मश्री डॉ.भवरलाल जैन